दैनिक www.esuryodaylive.com
महाराष्ट्र
# सूर्योदय
Email : suryodaykokan.123@gmail.com
मुख्य संपादक : गंगाधर काळकुटे
नविननिश्चल देवाजी येनोरकर
(विदर्भ आवृत्ती कार्यकारी संपादक)
लक्ष्मण फकिरबा कांबळे (आवृत्ती संपादक) , किरण काळे (आवृत्ती कार्यकारी संपादक)





छत्रपती संभाजीनगर || वर्ष २ रे || अंक २०८ || गुरूवार ११ जुलै २०२४ || RNI No.MAHMAR/2014/54581 || Postal Regd No.L/74/RNP/Beed/2019-21 || पाने ४ किंमत २ रुपये ||

## आदिवासी क्षेत्रातील रस्त्यांची होणार दर्जोन्नती : खा.प्रफुल पटेल यांच्या प्रयत्नांचे फलित – ९.५० कोटीचा निधी मंजूर

दैनिक सूर्योदय
निश्चल येनोरकर
भंडारा/गोंदिया :

जिल्ह्यातील आदिवासी क्षेत्राचा विकास व्हावा, यासाठी खा.प्रफुल पटेल यांनी लक्ष केंद्रीत केले आहे. यासाठी माजी आमदार राजेंद्र जैन यांनी आदिवासी क्षेत्रातील प्रस्तावित विकासकामांसाठी निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी खा.पटेलांकडे केली होती. त्यानुरूप अर्थसंकल्पीय अधिवेशनात खा.प्रफुल पटेल यांनी वित्त मंत्रालय व आदिवासी विकास मंत्रालयाशी पाठपुरावा करून विकासकामे मंजूर करवून



घेतली आहेत. यासाठी शासनाने ९.५० कोटीचा निधी मंजूर केला आहे. या निधीतून जिल्ह्यातील सडक अर्जुनी, अर्जुनी मोरगाव व सालेकसा या आदिवासी क्षेत्रातील रस्ता दर्जोन्नतीचे कामे होणार आहेत. ङ्गगोंदिया जिल्ह्यातील आदिवासी क्षेत्रात विकासकामांवर भर देणे, क्षेत्रातील नागरिकांना मुलभूत सोयी-सुविधा व दळणवळणाची सोय उपलब्ध करून देणे यासाठी खा.प्रफुल पटेल हे आग्रही राहिले आहेत. या संदर्भात माजी आमदार राजेंद्र जैन यांनी ही बाब खा.प्रफुल पटेल यांच्या निदर्शनास आणून दिली. तसेच प्रस्ताविक असलेल्या विकासकामांसाठी शासनस्तरावर पाठपुरावा करून निधी उपलब्ध करवून द्यावा, अशी विनंती केली. आदिवासी क्षेत्राच्या विकासावर भर देण्यासाठी खा.प्रफुल पटेल यांनी शासनस्तरावर पाठपुरावा सुरू केला. त्यातच अर्थसंकल्पीय अधिवेशनात राज्याचे वित्त मंत्रालय व आदिवासी विकास मंत्रालय यांच्याकडे पाठपुरावा करून निधीची मागणी केली. दरम्यान मंत्रालयीन स्तरावर करण्यात आलेल्या पाठपुराव्याला यश आले असून शासनाने जिल्ह्यातील सडक अर्जुनी, अर्जुनी मोरगाव व सालेकसा या आदिवासी बहुल क्षेत्रातील रस्ता दर्जोन्नतीच्या विकासकामांसाठी ९.५० कोटीचा निधी प्राप्त झाला आहे. या निधीतून रस्ता दर्जोन्नतीची कामे करण्यात येणार असून परिसरातील नागरिकांना दिलासा मिळणार आहे.विशेष म्हणजे अर्जुनी मोरगाव व सडक अर्जुनी या दोन तालुक्यात जवळपास २९ विकासकामे केली जाणार आहेत. यासाठी ९ कोटीहून अधिकचा निधी मंजूर करण्यात आला आहे. विकासकामांच्या माध्यमातून आदिवासी बहुल क्षेत्रातील नागरिकांच्या दळणवळण विषयक समस्या मार्गी लागून दिलासा मिळणार, असे माजी आमदार राजेंद्र जैन यांनी व्यक्त केले आहे.

या कामांचा समावेश

मंजूर झालेल्या निधीतून करण्यात येणार्या विकासकामांमध्ये अर्जुनी मोरगाव तालुक्यातील अरततोंडी-कोरंभी, प्रतापगड-खोकरी, बोंडगाव-गांधारी, कढोली-बोंडगाव, रामनगर-संजयनगर, पांढरवाणी माल - झोडेटोली, गोठणगाव - आश्रमशाळा, झाशीनगर जोडमार्ग, प्रतापगड-खोकरी, बोंडगाव-गांधारी, कढोली-बोंडगाव, रामनगर-संजयनगर, पांढरवाणी माल - झोडेटोली, सडक अर्जुनी तालुक्यातील बेहळीटोला जोड रस्ता, माहुली-बिर्री, धानोरी-चिचटोला, धानोरी-लेंडेझरी, टेकरीपार जोड रस्ता, कोकणा-परसोडी, रेंगेपार-मोकाशिटोला, खोबा-गोंविदखोबा, कोकणा बायपास मार्ग, रामकनेरी-कोकणा, पाथरगोठा-कन्हारटोला, आंभोरा-परसटोला, केळवद-गवर्रांटोला, केळवद-गवर्रांटोला, केळवद-गवर्रांटोला तसेच सालेकसा तालुक्यातील कारूटोला-चिचटोला व रामाटोला-कुलभरट्टी या रस्ता बांधकामाचा समावेश आहे.

## दुधाला हमीभाव मागणीसाठी परिसरातील शेकडो शेतकऱ्यांची आंदोलनाला उपस्थिती..

भोकरदन प्रतिनिधी
सद्दाम मिर्झा

आज दिनांक ९ जुलै २०२४ वार मंगळवार रोजी सकाळी ११ वाजता जालना जिल्ह्यातील भोकरदन येथून जवळच असलेल्या सिल्लोड भोकरदन या मुख्य महामार्गावर मालखेडा फाट्यावर लोकजागर अभियानाचे नेते केशव पाटील जंजाळ यांच्या नेतृत्वामध्ये रास्ता रोको आंदोलन करण्यात आले आहे ,यामध्ये मागण्या करण्यात आल्या आहे ,की शेतकऱ्याच्या दुधाला सरकारने हमी ४५ रुपये भाव द्यावा तसेच शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी द्यावी व जालना जिल्ह्यात व भोकरदन तालुक्यात मागील काही दिवसापासून बंद असलेल्या एमआरजीएस विहिरी च्या कामांना मंजुरी देण्यात यावी व शेतकऱ्यांना तात्काळ पीक कर्ज देण्यात यावे यासारख्या असंख्य मागणी घेऊन आज हे रास्ता रोको आंदोलन



करण्यात आले आहे ,या आंदोलनादरम्यान शेकडो शेतकऱ्यांच्या उपस्थितीमध्ये सरकारचा निषेध म्हणून मुख्य महामार्गावर दूध सांडत हे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले आहे, यावेळी पोलिसांच्या वतीने या आंदोलनाला परवानगी जरी नाकारली असली तरी मात्र लोकशाही मार्गाने हे आंदोलन करण्यात आले असून आंदोलनाच्या वेळी मुख्य महामार्गावर रस्त्याच्या दोन्ही बाजूला दुतर्फ वाहनांच्या रांगा लागल्याचे पाहायला मिळाले यावेळी कुठलाही अनुचित प्रकार घडू नये म्हणून भोकरदन पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बालाजी वैद्य हे तात्काळ आंदोलन स्थळी पोहोचले व आंदोलकाना समजवत महामार्ग मोकळा करण्याची विनंती केली मात्र आंदोलक आपल्या आंदोलनावर ठाम राहिले जोपर्यंत या आंदोलन स्थळी भोकरदनचे तहसीलदार येत नाही व आमचे निवेदन स्वीकारत नाही तोपर्यंत आम्ही आंदोलन माघार घेणार नाही असा इशारा यावेळी या शेकडो शेतकऱ्यांच्या वतीने देण्यात आला होता, यावेळी काही वेळाने या ठिकाणी भोकरदन चे तहसीलदार श्री बनकर साहेब हजर झाले व रस्ता रोको मागे घेण्याची विनंती केली यावेळी लवकरात लवकर आमच्या या मागण्या शासन दरबारी मांडून सोडवा कारण आता सध्या पावसाळी अधिवेशन सुरू आहे, आणि अधिवेशनात सरकारने मुद्दा मांडून शेतकऱ्यांच्या डोळ्याचे आसू पुसावे अशी विनंती यावेळी लोकजागर अभियानाचे नेते केशव पाटील जंजाळ यांनी केली आहे. सोबत सर्व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते

## भंडारा शहरातील गांधी चौक येथील राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचा पुतळा तात्काळ बदविन्याबाबत नगर परिषद मुख्य अधिकारी याना निवेदन देण्यात आले

दैनिक सूर्योदय
निश्चल येनोरकर / भंडारा

शहरातील मुख्य चौकामध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचा पुतळा जीर्ण अवस्थेत




असल्याने अनेकदा आपल्या कार्यालयाला निवेदन देण्यात आले होते. त्या अनुषंगाने नगर परिषद सर्वसाधारण सभा वर्ष २०२२ मध्ये सर्वानुमते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचा पुतळा बदलविण्याचा ठराव मंजूर करण्यात आला होता. ह्या ठरवला २ वर्षे पूर्ण झाले असता आता पर्यंत आपल्या कार्यालयाद्वारे ह्या विषयावर कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. ङ्ग दि. ०८ जुलै २०२४ रोजी अज्ञात व्यक्ती कडून राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुतळ्याची शती झालेली आहे. यावर वेळेवर कार्यवाही झाली असती तर हा प्रकार घडला नसता. तरी आपणास विनंती करण्यात येते की, गांधी चौक येथील राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचा पुतळा तत्काळ बदलून नवीन धातूचा पुतळा बसविण्यात यावा असे निवेदन देण्यात आले. हया प्रसंगी भाजप जिल्हा महामंत्री आशु गोंडाने , जिल्हा उपाध्यक्ष रब्बी चढ्ढा , शहर अध्यक्ष सचिन कुंभलकर , भाजपा वरिष्ठ नेते रामदासजी शहारे , प्रशांत निंबोळकर , रोनक उजवणे , शैलेश मेश्राम , शिव अजबले , आकाश फाले अजय कावळे आदि उपस्थित होते .

## अमर हॉस्पिटलचे परवाने रद्द करा!अन्याय अत्याचार निवारण हक्क पर्यावरण समितीची मागणी

सद्दाम मिर्झा

भोकरदन येथील अमर हॉस्पिटल मधील मागच्या बिल्डिंगमध्ये काही दिवसा अगोदरच घडलेल्या प्रकारबाबत आता अन्याय अत्याचार निवारण हक्क परिवरन संरक्षण समितीने अमर हॉस्पिटल वर कारवाई करण्यास निवेदन दिले आहे १७/८/२०२२रोजी आपले संबंधित कार्यालयातील सविस्तर तक्रार देऊन ग्रामीण रुग्णालय भोकरदन समोर अमर हॉस्पिटलमध्ये मधील काही वर्षांपासून बेकायदेशीर गर्भलिंग निदान व गर्भपात करीत असल्याचे मोठे रॅकेट नियोजित पद्धतीने चालू असल्याची तक्रार व पुरावे दोन वर्षांपूर्वी डॉ. शुल्कचिकित्सक अधिकारी जालना यांच्याकडे पुरावे व साक्षीदार देऊन साक्षीदाराची दिशाभूल करून प्रकरण दाबण्याचे अधिकारी व कर्मचारी विरुद्ध तसेच अमर हॉस्पिटलचे चालक डॉ. के एन राजपूत व अमर के राजपूत दिलीप किसन सिंग राजपूत यांच्याविरुद्ध पीसीपीएनडीटी कायदे अंतर्गत कारवाई करून संबंधित हॉस्पिटलचे परवाने रद्द करावे तक्रार सादर करून आपल्या निदर्शनात आणून देत आहे की जालना जिल्ह्यामध्ये भोकरदन तालुक्यात ग्रामीण रुग्णालय समोर अमर हॉस्पिटल मध्ये काही वर्षापासून बेकायदेशीर गर्भलिंग निदान व गर्भपात करीत असल्याची सविस्तर तक्रार १७/८/ २०२२ आपले व इतर संबंधित सर्व कार्यालयांमध्ये दिली होती तक्रारी मध्ये नमूद प्रमाणे व्हिडिओ शूटिंग केलेले कॅसेट डॉ. अर्चना भोसले तात्कालीन जिल्हा शुल्कचिकित्सक जालना पीसीपीएनडीटी विधी सल्लागार सोनाली कांबळे, यांच्याकडे दिली होती सादर कॅसेटमध्ये स्पष्ट दिसत नसल्याने व स्पष्ट ऐकू येत नसल्याने त्यांनी तक्रार मध्ये नमूद लोकांना अशी धमकी दिली की जवाब घेऊन त्यांच्या विरोधात कारवाई केली जाईल परंतु त्या अगोदर तुमच्या नातेवाईकां वर तुमच्यावर सुद्धा कारवाई करू अशी धमकी दिल्याने संबंधित साक्षीदार दबाव निर्माण केल्याने ते साक्षीदार साक्षी ना देताच निघून गेले तसेच भोकरदन कर्मचाऱ्यांना दर महा लाच म्हणून ठरवून दिलेले पॅकेट मिळत असल्याने बेकायदेशीर गर्भनिदान व गर्भपात होत असल्याची माहिती असताना सुद्धा त्यांना पूर्ण सहकार्य करून प्रकरण दाबण्याचे असल्याने अमर हॉस्पिटलचे सर्व चालक मालक यांची हिम्मत वाढल्याने त्यांची महाराष्ट्रातील जालना व औरंगाबाद येथे बऱ्याच डॉक्टरांशी संपर्क साधून त्या डॉ.गर्भ लिंग निदान व गर्भात करण्याचे सारे साहित्य चायना कंपनीचे पोर्टेबल सोनोग्राफी मशीन त्या त्याला मोबाईल टॅब द्वारे जोडून रिपोर्ट दिला जातो तसेच औषध उपलब्ध करून दिल्याने हे रॉकेट नियोजित पद्धतीने लहान मोठे खेडेपाड्यातील डॉ. चालक व विश्वासातील एजंट नेमून मोठ्या प्रमाणात चालू असल्याने आता काही दिवसापूर्वीच छ. संभाजीनगर येथील पुंडलिक नगर पोलीस स्टेशन तसेच छावणी पोलीस स्टेशन मध्ये बऱ्याचपैकी गुन्हे दाखल झाल्याने त्यांचे धागेदोरे सिल्लोड भोकरदन पासून सुरू झाले व ते जालना औरंगाबाद जिल्ह्यामध्ये बऱ्याच गावांचे डॉ. मेडिकल धारक त्यांच्या विरोधात गुन्हे दाखल झाल्याने जवळपास ४०ते ५० आरोपींची नावे घेण्यात आली त्यामध्ये मोठ्या प्रमाणात रक्कम देणारे डॉ. मेडिकल धारकांना सोडून देण्यात येत असल्याचे सर्व दलाल एजंट डॉक्टर मेडिकल धारक चर्चा करीत आहे तसेच हा रॉकेट मागील दहा वर्षापासून चालू असल्याने महाराष्ट्रात मुलींची टक्केवारी २०% ने कमी झाली या सर्व रॉकेट मुळे सूत्रधार भोकरदन येथील अमर हॉस्पिटलचे मालक डॉ. के एन राजपूत अमर के राजपूत दिलीप किसन सिंग राजपूत हे असून यांना स्थानिक राजकीय पाठबळ असल्याने आरोग्य विभाग तसेच गृह विभागाने अधिकारी कर्मचारी यांना च्या पाठीशी घालून सादर प्रकरणात दर्पणाची परिपूर्ण प्रयत्न करीत असल्याने आपल्या स्तरावर तज्ञ समिती नेमणूक भोकरदन येथील अमर हॉस्पिटलचे राजपूत यांना ताब्यात घेऊन व अमर हॉस्पिटलला सील करून पुंडलिक नगर व छावणी पोलीस स्टेशन मधील नमूद आरोपी व संशय आरोपींची यादी घेऊन संबंधित डॉ. एजंट आरोपी विरुद्ध पीसीपीएनडीटी कायदे अंतर्गत कठोर कारवाई करून हॉस्पिटलचे परवाने रद्द करावेत व या निवेदनाची पंधरा दिवसात दखल घेऊन उचित कारवाई न केल्यास १/७/२०२४ रोजी विभागीय आयुक्त संभाजीनगर लोकशाही मार्गाने आमरण उपोषण करण्यात येईल असे अन्याय अत्याचार निवारण हक्क पर्यावरण संरक्षण समिती चे पदाधिकारी यांनी केली आहे.

संपादकीय

# ‘कित्येक ट्रंका’

‘दंड’ न करता ‘न्याय’ करणारी नवी संहिता वाजत-गाजत अमलात येत असताना आणि राजधानी दिल्लीत या नव्या नियमावलीचे गुणगान सत्ताधाऱ्यांकडून सुरू असताना तिकडे झारखंडचे माजी मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना उच्च न्यायालयाने दिलेल्या जामिनाची चर्चा होणे हा खरा काव्यात्म न्याय. सोरेन हे सत्ताधारी भाजपस आव्हान देणाऱ्या झारखंड मुक्ती मोर्चा या पक्षाचे प्रमुख होते आणि आहेत. ऐन निवडणुकीच्या काळात त्यांना तुरुंगात डांबून त्या पक्षावर मात करण्याचा प्रयत्न भाजपकडून झाला. त्या प्रांतातील राजकीय रिवाजाप्रमाणे सोरेन तुरुंगात असताना त्यांच्या पत्नीने किल्ला लढवला या वा अन्य कारणांमुळे सोरेन यांस मिळालेला जामीन महत्त्वाचा ठरतो, असे बिलकूल नाही. तर ज्या गुन्ह्यासाठी सोरेन यांस सक्तवसुली संचालनालयाने तुरुंगात डांबले, जो आर्थिक घोटाळा सोरेन यांनी केला असे केंद्रीय पातळीवर कंठशोष करून सांगितले जात होते, ज्या भ्रष्टाचारासाठी सोरेन यांच्यावर ठपका ठेवला जात होता ते वा तसे काही करण्यात सोरेन यांचा हात असल्याचा पुरावा नाही, असे न्यायाधीश सोरेन यांस जामीन देताना म्हणतात ही बाब संबंधित यंत्रणांसाठी आणि ती यंत्रणा राबवणाऱ्यांसाठी लाजिरवाणी ठरते. या नामुष्कीवर निर्विवाद मालकी हक्क केंद्र सरकारचा. संसदेत राजकीय प्रतिस्पर्ध्यास केंद्रीय यंत्रणांच्या ससेमिऱ्याद्वारे नामोहरम करण्याचा कसा प्रयत्न होतो याचे वाभाडे निघत असताना त्या पार्श्वभूमीवर सोरेन यांचे एकूणच प्रकरण मुदलात समजून घेणे रास्त.

सोरेन यांस अटक झाली ३१ जानेवारी रोजी. मनरेगा, खाण कंत्राट इत्यादींतील सोरेन यांच्या कथित घोटाळ्यांची सक्तवसुली संचालनालयाकडून चौकशी सुरू होती. यापेक्षाही गंभीर होता तो लष्करी अधिकाऱ्यांसाठी असलेला भूखंड सोरेन यांनी अवैधपणे विकल्याचा आरोप. हा जमीन विक्रीचा प्रकार प्रथम आढळला लष्करी यंत्रणेस. आपल्या अखत्यारीतल्या जमिनींच्या नोंदी तपासत असताना झारखंडमधील जागेच्या मालकीबाबत काही फेरफार झाल्याचे या विभागास लक्षात आले आणि त्यामुळे त्याची चौकशी सुरू झाली. यात नाव समोर आले ते कोणा भानु प्रताप प्रसाद नामे इसमाचे. ही सरकारी सेवेतील व्यक्ती जमिनींच्या व्यवहारांसाठी त्या भागात ओळखली जाते. लष्कराच्या या जमीन व्यवहारात तिचा सहभाग असल्याच्या संशयावरून गतसाली एप्रिल महिन्यात सक्तवसुली संचालनालयाने धाडसत्र हाती घेतले. त्यात ‘कित्येक ट्रंका’ भरून जमीन व्यवहारांचा दस्तावेज साठा त्याच्या घरून हाती घेण्यात आल्याचे संबंधितांकडून सांगितले गेले. सरकारी सेवेत असलेल्या या प्रसाद यांचे लागेबांधे थेट मुख्यमंत्री सोरेन यांच्याशी आहेत असे सक्तवसुली यंत्रणेचे म्हणणे. त्यात सोरेन हे केंद्र सत्ताधारी भाजपस राजकीयदृष्ट्या प्रतिकूल हा केवळ योगायोग म्हणायचा. त्याच योगायोग मालिकेतून या प्रसाद यांच्याविरोधात कारवाई सुरू झाली आणि ती करता करता संबंधित यंत्रणेने गतसाली सोरेन यांच्यावरही गैरव्यवहारांचा ठपका ठेवून त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला गेला. या प्रसाद यांस तुरुंगात डांबल्यानंतर त्यांच्या मोबाइल फोनमधील तपशील तपास यंत्रणांनी काढून घेतला आणि त्याद्वारेही त्याचे आणि सोरेन यांचे संबंध सिद्ध करण्याचा प्रयत्न झाला. यात वादग्रस्त ठरलेला जमिनीचा तुकडा प्रत्यक्षात सोरेन यांच्या मालकीचा आहे, असेही सांगितले गेले आणि ही मालकी सिद्ध करण्यासाठी जंग जंग पछाडले गेले. ही लष्करी जमीन खरेदी करण्याचा अधिकार सोरेन यांस मुळातच नाही आणि तरीही त्यांनी हा जमीन व्यवहार केला हा यातील मध्यवर्ती आरोप. ‘प्रिव्हेन्शन ऑफ मनी लॉण्डिरग ॲक्ट’ (पीएमएलए) या सध्या विरोधी पक्षीयांविरोधात परवलीच्या झालेल्या कायद्यांतर्गत सोरेन यांच्याविरोधात प्रकरण चालवले गेले आणि अखेर जानेवारी महिन्याच्या अखेरीस त्यांस अटक झाली.

म्हणजे सोरेन यांनी कधी न्यायालयीन कोठडी तर कधी पोलीस कोठडी असे पाच महिने तुरुंगात घालवले. गेल्या शुक्रवारी त्यांस जामीन मिळाला. तो देताना झारखंड उच्च न्यायालयाचे न्या. रंगोन मुखोपाध्याय यांनी सक्तवसुली संचालनालयाच्या आरोपपत्राची जी चिरफाड केली ती लक्षात घेण्यासारखी आहे. ज्या जमिनीबाबत सोरेन यांच्यावर ठपका ठेवला गेला त्या जमिनीवर इतकी वर्षे वास्तव्य करणाऱ्यांनी इतक्या वर्षांत या व्यवहाराबाबत काहीच कसा आवाज उठवला नाही येथपासून ते या जमिनीवर सोरेन हे भोजनगृह बांधू इच्छितात

# पनवेल तालुक्यातील लेडीज डान्सबार व अवैध धंद्यावर आमदार प्रशांत ठाकूर विधिमंडळात चिडीचूप

पनवेल / जयेश जाधव

पनवेल तालुक्याच्या दृष्टिकोनातून ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा, घनकचरा, सांडपाणी आणि उपाययोजना, उपजिल्हा रुग्णालय, तसेच शाळांच्या हस्तांतरण बाबत आमदार प्रशांत ठाकूर यांनी विधिमंडळात अर्थसंकल्प अनुदानाच्या मागणीवर चर्चा आणि त्या अनुषंगाने मागणी केली. शाळांचे पनवेल महापालिकेकडे हस्तांतरण करा जिल्हा परिषदेच्या ५१ शाळा महापालिका हद्दीत असूनही व्यवस्थापन मात्र त्याचे ग्रामविकास विभागाकडे आहे.या शाळांना पायाभूत व इतर सुविधांची गरज असल्याने या सर्व शाळांचे हस्तांतरण पनवेल महापालिकेकडे करण्यात यावे, अशी मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी विधिमंडळात केली. पनवेल उपजिल्हा रुग्णालयात आवश्यक स्टाफ आणि संपूर्ण सुविधा दिल्या जात नाही आणि रुग्णांची संख्या पाहता हे शंभर खाटांचे रुग्णालय अपुरे पडत आहे, त्यामुळे ते आता २०० खाटांचे रुग्णालय करा, तसेच वाढते अपघातांचे प्रमाण पाहता या ठिकाणी अपघातांचे रुग्ण मोठ्या प्रमाणात येत असून १०० खाटांचे ट्रॉमा केअर हॉस्पिटल उभारावे



त्याचबरोबरीने शवविच्छेदनला प्रचंड विलंब होत असल्याने पोस्टमार्टम सेंटर निर्माण करा, अशी आग्रही मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी केली. मात्र पनवेल तालुक्यातील डान्सबार संस्कृती, अवैध हुक्का पार्लर, जुगार अड्डे, गुटखाविक्री यासारख्या प्रश्नांवर मात्र आमदार प्रशांत ठाकूर हे चिडीचूप असल्याचे दिसून आले. ङ्ग पुण्यामधील कल्याणी नगर येथे घडलेल्या घटनेमुळे अनेक ठिकाणचे लेडीज बार आणि पब वर स्थानिक स्वराज्य संस्था आणि शासकीय यंत्रणांनी बुलडोजर फिरवला आहे. यासंदर्भात राज्य शासन अतिशय कठोर भूमिका घेत असताना पनवेल तालुक्यातील कोन येथे शाळेच्या भिंतीला लागून लेडीज बार असताना त्याच्यावर कारवाई होताना दिसत नाही. राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या मंत्र्यांनी आदेश देऊनही याबाबत कार्यवाही झाली नाही. नियमापेक्षा अंतर जास्त असल्याचा दावा याच विभागाच्या अधिकाऱ्यांनी केल्याने ज्ञानाच्या मंदिराच्या बाजूला छम छम सुरू आहे.ङ्ग पनवेल परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात लेडीज बार आहेत. या ठिकाणी घाटमाथ्यावरून आंबट शौकीन पैसे उडवण्यासाठी येतात. दरम्यान कोन येथे अगदी शाळा आणि मंदिराच्या बाजूला लेडीज बार आहेत. ज्ञान आणि श्रद्धेच्या मंदिरालगत अशाप्रकारे लाईव्ह ऑर्केस्ट्रा बार चालवला जात आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून ही बार संस्कृती येथे फोफावली आहे. प्रसार माध्यमांनी या संदर्भात आवाज उठवल्यानंतर पोलिसांनी नियमांचे उल्लंघन करणाऱ्या बारमालकांवर कायदेशीर कारवाई केली. परंतु यासंदर्भात ठोस भूमिका राज्य उत्पादन शुल्क विभाग आणि पोलिसांनी घेतलेली नाही. कोन या ठिकाणी अगदी शाळेला लागून लेडीज बार आहे. शाळा सुरू असतानाच त्या ठिकाणी बारबाला येतात. त्याचबरोबर छम छम सुरू होते. या बार संस्कृतीचा परिणाम बालमनावर होत आहे. याबाबत प्रसारमाध्यमांनी सुद्धा आवाज उठवला होता. महाराष्ट्र राज्य उत्पादन शुल्क विभागाचे मंत्री शंभूराजे देसाई यांनी शाळांच्या बाजूला असलेल्या बारवर कारवाई करण्याचे निर्देश दिले होते. परंतु ते आदेश फक्त नावापुरतेच राहिले आहेत.पनवेल सह इतर शहरांमधील शाळा परिसरात बार व मद्य विक्री सुरू असल्यास संबंधित ठिकाणी तातडीने कारवाई करण्याचे निर्देश त्यांनी काही महिन्यापूर्वी दिले होते. शैक्षणिक संस्था, धार्मिक स्थळे, बस स्थानक, राष्ट्रीय परिसरात हॉटेल किंवा रेस्टॉरंटमध्ये मद्य विक्रीस बंदी आहे. या नियमांची काटेकोर अंमलबजावणी करावी. कोणत्याही परिस्थितीत बेकायदेशीरपणे मद्य विक्री होऊ देऊ नये. विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष स्थळावर जाऊन पाहणी करावी आणि बेकायदेशीरपणे व नियम डावलून सुरू असणाऱ्या बार व हॉटेलवर तातडीने कारवाई करावी, अशा सूचना मंत्री देसाई यांनी यावेळी केल्या होत्या. परंतु कोन शाळेच्या बाजूला असणाऱ्या बारवर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. मुंबई नवी मुंबई, ठाणे कल्याण त्याचबरोबर मीरा भाईंदर परिसरामध्ये बेकायदेशीर पब यांच्यावर बुलडोझर फिरवण्यात आला आहे, पुण्यामध्ये सुद्धा ही कारवाई मोठ्या प्रमाणात करण्यात आली आहे. परंतु पनवेल तालुक्यातील कोन परिसरातील शाळेच्या बाजूला असणाऱ्या लेडीज बार वर कधी हातोडा पडणार याबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात येत आहे.यासंदर्भात आमदार प्रशांत ठाकूर यांनी विधिमंडळात चर्चा करणे अपेक्षित होते मात्र आमदार प्रशांत ठाकूर यांनी याबाबत मात्र याबाबत एक अवाक्षरही काढले नाही.

# आरोग्यवर्धक रानभाज्यांची वैशिष्ट्यपूर्ण खाद्य संस्कृती रानभाज्या व पाककला महोत्सव शास्त्रीय माहिती व रोजगार

रायगड जिल्हा उत्तर प्रतिनिधी
मंगेश यादव

पावसाळ्यात जिल्ह्यातील रानावनात व रानमाळावर विविध रानभाज्या बहरल्या आहेत. या विशेष हंगामात मिळणाऱ्या आरोग्यवर्धक रानभाज्यांचे सेवन केल्याने आरोग्य निरोगी राहण्यास मदत होते. रोजच्या आहारात या रानभाज्यांचा समावेश असतो. जिल्ह्यात या रानभाज्यांची वैशिष्ट्यपूर्ण खाद्य संस्कृती निर्माण झाली आहे.

या रानभाज्या मोठ्या प्रमाणात बाजारात उपलब्ध होत आहेत. आदिवासी महिलांना या रानभाज्या विकून चांगला रोजगार देखील मिळतो. तसेच जिल्ह्यात अनेक ठिकाणी रानभाज्या महोत्सव व पाककृती महोत्सव भरले जात असल्याने रानभाज्यांबाबत जनजागृती होत आहे. तसेच व्यवसाय सुद्धा मिळत आहे. ङ्ग

रानभाज्या आपोआप उगतात. कोणतही खत किंवा कीटकनाशक न वापरता पूर्णपणे नैसर्गिक पद्धतीने उगवलेल्या या रानभाज्या म्हणजे पावसाळ्यातील आरोग्यदायी पर्वणीच असते.

रानभाज्या महोत्सव

रानभाज्या या औषधी असतात, त्यामुळे पावसाळ्यात आरोग्य चांगले राहते. म्हणून जिल्हात कृषी विभाग, कृषी पर्यटन करणारे व समाजसेवी संस्थांच्या माध्यमातून रानभाज्यांचे महोत्सव सुद्धा भरवले जातात.ङ्ग सुधागड तालुक्यातील उद्धर येथील प्रयोगशील शेतकरी तुषार केळकर यांनी आपल्या आत्मतृप्ती या कृषी केंद्रावर जुलै महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यातील प्रत्येक शनिवार व रविवारी रानभाजी महोत्सवाचे आयोजन केले आहे. मागील अनेक वर्ष ते अशाप्रकारे रानभाज्या महोत्सव भरवत आहेत. या



महोत्सवात मुंबई, पुणे आदींसह विविध शहरातील नागरिक, मुले, महिला आवर्जून सहभागी होतात. या रानभाज्या महोत्सवात त्यांना विविध रानभाज्यांची प्रत्यक्ष ओळख करून दिली जाते. जंगलामध्ये फिरून रानभाज्या कशा प्रकारे उगवल्या जातात त्याची माहिती दिली जाते. आणि याचबरोबर रानभाज्या काढून त्याची पाककृती करून ती सर्वजण मिळून खातात. अशाप्रकारे हा रानभाज्या महोत्सव अतिशय उत्कृष्टपणे साजरा केला जातो.

कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) अंतर्गत जिल्ह्यातील जिल्हा तालुका स्तरीय रानभाज्या व पाककला महोत्सवाचे आयोजन केले जाते. ज्या माध्यमातून रानभाज्यांची शास्त्रशुद्ध माहिती तर मिळतेच पण स्थानिक शेतकरी व महिला बचत गटांना रोजगार देखील उपलब्ध होतो.

विविध रानभाज्या

कौला/कैलाच्या पानांची भाजी, जिवतीच्या फुलांची भाजी, कुर्डू, कुळी, टाकळा आणि आम्लीच्या पानांची एकत्रित पंचभेळी भाजी करतात. बऱ्याच रानभाज्यांची मिळून एक मिसळ भाजी करतात. देठी, देवभात, भारंगी, चाव्याचा बार/शेंडवेल, चिचार्डी, मेकी, पाथरी, रानअळू व केनी आदी भाज्यांची भाजी करतात. चवळीच्या पानांचे बेसन घालून मुठे करतात. सुरण, आळूकंद, करंदकंद आणि काशी कोहळा यांची भाजी करतात. ङ्ग खरशिंग, दिंडा, लोथ, पेटा, भारंगी, अळू, तेरुली, फांगली, टाकळा, अग्निशिखा, रानतुळस, बांबू कोंब, रताळ्याचे कोंब, कवदर, कैला, टरली, कसविंदा , कुड्याच्या शेंगा, अक्रोड कुडू अशा विविध प्रकारच्या रानभाज्या आहेत.

कपाळफोडी

कपाळफोडीच्या पानांची भाजी करतात. जीर्ण आमवातामध्ये पानांची भाजी खाण्याची प्रथा आहे. ही भाजी आमवात या संधिवाताच्या प्रकारात गुणकारी आहे. पोट गच्च होणे, मलाविरोध सारख्या विकारात कपाळफोडीच्या भाजीने आराम मिळतो. स्त्रियांची मासिक पाळी नियमित होत नसेल तर या भाजीचा चांगला उपयोग होतो. आधुनिक शास्त्रानुसार कपाळफोडी च्या पानात अँटिबायोटिक व अँटिपॅरासायटिक तत्त्वे असल्याने जुनाट खोकल्यावर कपाळफोडीची भाजी उपयुक्त आहे.ङ्गङ्गङ्गभारंगङ्ग ही भाजी जिल्ह्यात मुबलक मिळत आहे. ही भाजी उगवल्यानंतर कोवळी असताना तोडली जाते. भारंगाची सुकी भाजी विशेष लोकप्रिय आहे. काहीजण वाल टाकून ही भाजी करतात. ङ्गङ्गङ्गकंटोलीङ्गकंटोली किंवा करटोली ही भाजी कारल्यासारखी दिसते. कारल्याची भाजी करतात तशीच या फळाची भाजी केली जाते. जिल्ह्यातील सर्व बाजारात आदिवासी महिला ही भाजी विक्रीसाठी घेऊन येत आहेत. मात्र भाव वधारले असून एक वाटा ५० रुपयांना आहे. कंटोली हे डोकेदुखी वर उत्तम औषध आहे. तसेच मधुमेहाच्या रुग्णांनी या भाजीचे नियमित सेवन केल्यास रक्तातील साखर कमी होते.ङ्गङ्गङ्गकुरडूची भाजीङ्ग कुरडूची कोवळी पाने शिजवून त्याची भाजी करतात. दमेकरी जुनाट खोकला, वृद्ध माणसांचा कफ विकार यात ही भाजी उपयुक्त आहे.कुरडूची पालेभाजीसुद्धा लघवी साफ करायला उपयोगी आहे. या पालेभाजीमुळे कफ कमी होतो. जुनाट विकारात कुरडूच्या पालेभाजीचा रस प्यावा. कुरडूच्या बिया मूतखडा विकारात उपयुक्त आहेत.ङ्गङ्गकुलुची भाजीङ्ग फोडशी किंवा कुलु किंवा काल्ला या नावाने हि रानभाजी ओळखली जाते. हि भाजी म्हणजे एक प्रकारचे गवतच असते. हि भाजी फक्त पावसाळ्यातच मिळते. इतर पावसाळी भाज्यांप्रमाणे हि चविष्ट असते. हि भाजी शाकाहारी व मांसाहारी या दोन्ही प्रकारात करता येतेङ्गङ्गकाटेमाठङ्गकाटेमाठच्या कोवळ्या भाज्या आणि कोवळ्या फांद्या भाजीसाठी वापरतात. पावसाळ्यात ओसाड जमिनीवर, रस्त्याच्या कडेला आणि शेतात काटेमाठ ही वनस्पती आढळते. ङ्गङ्गचुकाङ्ग चुक्याच्या पानांची, कोवळ्या फांद्यांची आणि खोडांची भाजी केली जाते. ओसाड जमिनीवर, बागेत आणि शेतात या वनस्पतीची वाढ होते. चुका ही भाजी अतिशय रुचकर असते त्यामुळे या भाजीला रोचनी नावाने सुद्धा ओळखले जाते. चुकाची भाजी आंबट-गोड असते.

# खांडस ग्रामपंचायत उपसरपंचपदी किशोर पोसाटे बिनविरोध निवड

कर्जत (जयेश जाधव) तालुक्यातील दुर्गम भागात असलेल्या खांडस ग्रामपंचायतीच्या रिक्त उपसरपंचपदाची निवडणूक आज पार पडली. या निवडणुकीमध्ये शिवसेना ठाकरे गटाचे किशोर पोसाटे यांची बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली. त्यामुळे पोसाटे यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव करण्यात येत आहे. ङ्ग कर्जत तालुक्यातील शेवटच्या टोकाला खांडस गाव वसलेले आहे. तर या ग्रामपंचायत हद्दीत आदिवासी दुर्गम भाग मोठ्या प्रमाणात आहे. मागच्या वर्षी या ग्रामपंचायतीसाठी सार्वत्रिक निवडणूक पार पडली होती. तर नुकतेच या ग्रामपंचायतीचे उपसरपंच लहू काशिनाथ ऐनकर यांनी राजीनामा दिला होता. त्यामुळे उपसरपंच पदाची जागा रिक्त झाली होती. या रिक्त जागेसाठी आज दिनांक १० जुलै रोजी सरपंच ताई पादीर यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामपंचायतीत विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते. तर विहित वेळेत शिवसेना ठाकरे गटाचे किशोर पोसाटे यांचा एकमेव अर्ज दाखल झाला. त्यामुळे थेट सरपंच ताई कचरू पादीर यांनी किशोर पोसाटे यांची बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर केले. यावेळी सर्व सदस्य उपस्थित होते. तर ग्रामसेवक बाळकृष्ण मोरे यांनी निवडणूक प्रक्रियेसाठी काम पाहिले.



पोसाटे यांची बिनविरोध निवड झाल्याने शिवसेना तालुकाप्रमुख उत्तम कोळंबे, संपर्कप्रमुख भिवसेन बडेकर, बाजीराव दळवी, निलेश थोरवे, लक्ष्मण पोसटे, असीम बूबेरे, रवींद्र ऐनकर, संतोष पाटील, माजी सरपंच मंगल ऐनकर, गोपीनाथ भोईर, विलास माळी, बाळू ऐनकर, दाजी ऐनकर, सीताराम बांगरे, दीपक ऐनकर, भरत ऐनकर, शिवाजी ऐनकर, सुरेश ऐनकर, बंदू पोसाटे, दुंदा पोसाटे, महादेव ऐनकर आदी उपस्थित मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करत शुभेच्छा दिल्या.



**रायगडचे खासदार सुनिल तटकरे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना शिवसेना रायगड जिल्हा संपर्क प्रमुख प्रकाशभाऊ देसाई, सोबत आमदार महेंद्र दळवी, जिल्हाप्रमुख राजा केणी, ॲड राजीव साबळे, सतीश देसाई . तर दुसऱ्या छायाचित्रात खा. तटकरे यांना पेढा भरवताना प्रकाशभाऊ देसाई (छाया :धम्मशील सावंत, पाली बेणसे )**

# खा. सुनील तटकरे यांचे वाढदिवसानिमित्त चरई खुर्द मधील शाळांतील ६० विदयार्थ्यांना शेक्षणिक साहित्य वाटप.

तळा कृष्णा भोसले.

कोकणचे भाग्यविधाते मा.खा. सुनिलजी तटकरे साहेबांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने तळा तालुक्यातीलआज ग्रुप ग्रामपंचायत चरई खुर्द मध्ये सर्व प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय उपयोगी वस्तू वाटप करण्यात आले. यावेळी ॲड. उत्तमजी जाधव , सरपंच प्रविणजी आंबर्ले , ग्रामपंचायत सदस्य अजयजी सावंत सुभाषजी खिडबीडे विजय आंबार्ले*यादी मान्यवर उपस्थित होते. यानंतर वस्तूवाटप आणि खाऊ वाटप केल्यावर विध्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद पाहून समाधान वाटले.



# धानोरे आदर्श प्राथमिक शाळेचे शिष्यवृत्ती परीक्षेत लक्षणीय यश कुणाल आवचर राज्यात दुसरा ; ४३ विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र

## उपक्रमशील मुख्याध्यापक लोखंडे यांचा विशेष सत्कार

पुणे विशेष प्रतिनिधी : – धानोरे ( ता.खेड ) आदर्श प्राथमिक शाळेतील शिष्यवृत्ती परीक्षेत धानोरे आदर्श प्राथमिक शाळेचा धमाकेदार निकाल लागला असून प्रशालेचे ४३ मुले शिष्यवृत्ती धारक म्हंणून पात्र ठरले आहेत. तर कुणाल आवचर राज्यात दुसरा आला असल्याचे मुख्याध्यापक सत्यवान लोखंडे यांनी कविता आवचर आहेत. गुणवत्ता यादीत १३ विद्यार्थी इयत्ता आठवी मोगरा गट यामध्ये नैतिक नेवारे, वेदांत क्षीरसागर, श्रेया खाडे, श्रुती कुटे, श्रेयशी देडे आर्या गावडे,वेदांत गावडे, वैष्णवी कुडदुलवार, सुमित लिंबापुरे, सृष्टी पठारे, विराज गावडे, ज्ञानेश्वरी वाघमारे, आयुष दाभाडे यांचा समावेश आहे.ङ्गमार्गदर्शक पांडुरंग आव्हाड गुणवत्ता



सांगितले. ङ्ग शिक्षणाधिकारी (प्राथ) प्रेरणा संजय नाईकडे, गटशिक्षणाधिकारी प.स.खेड अमोल जंगले, विस्ताराधिकारी जीवन कोकणे, विस्ताराधिकारी प.स. खेड श्रीरंग चिमटे यांनी सर्व विद्यार्थी, मार्गदर्शक शिक्षक यांचे मुख्याध्यापक व शिक्षक, अध्यक्ष,उपाध्यक्ष व सदस्य शाळा व्यवस्थापन समिती धानोरे, सरपंच,उपसरपंच, सदस्य ग्रामपंचायत धानोरे यांच्या वतीने मुलांचे तसेच परिश्रम घेतलेल्या सर्व शिक्षक, मुख्याध्यापकांचे अभिनंदन करण्यात आले. आळंदी जनहित फाउंडेशनचे वतीने उपक्रमशील मुख्याध्यापक सत्यवान लोखंडे यांचे अभिनंदन अध्यक्ष राजेंद्र घुंडरे, कार्याध्यक्ष अर्जुन मेदनकर यांनी केले. ङ्गशिष्यवृत्ती पत्रा मुलांना मार्गदर्शक शिक्षिका सुनीता पाटील / भातकांडे यांनी मार्गदर्शन केले आहे. विशेष म्हणजे पुणे जिल्हा परिषदेच्या शाळेने यश मिळवले आहे. धानोरे परिसरात प्रशालेच्या मुख्याध्यापक, शिक्षक, शाळा व्यवस्थापन समिती पदाधिकारी आणि स्थानिक लोक प्रतिनिधी यांनी गुणवंत विद्यार्थी यांचेसह शैक्षणिक क्षेत्रातील मार्गदर्शकांचे कौतुक केले आहे. ङ्ग गुमवंत मुलांमध्ये इयत्ता आठवीचे २३ विद्यार्थी आणि इयत्ता पाचवी १९ विद्यार्थी यांचा समावेश आहे.ङ्गइयत्ता आठवी गुणवत्ता यादीत २३ विद्यार्थी मार्गदर्शक शिक्षक यादीत इयत्ता आठवी शरयू ७ विद्यार्थी यामध्ये गौरव हिवाळे, तुकाराम भोसले, सना शेख, अस्मिता तांबे, दिव्या कदम, शिवम मुंढे, सिद्धी थोरवे यांचा समावेश आहे. ङ्ग इयत्ता आठवी सिंहगड गट मार्गदर्शक रेणुका कोरे गुणवत्ता यादीत पूजा सपकाळ, श्रावणी फुंदे, साक्षी काळे, हेमांगी गायकवाड यांचा समावेश आहे. ङ्गइयत्ता पाचवी गुणवत्ता यादीतील विद्यार्थी १९ मार्गदर्शक सुनिता पाटील / भातकांडे १२ विद्यार्थी गुणवत्ता यादीत यामध्ये इयत्ता पाचवी अ सूर्यफूल गट पट संख्या ३९ उत्तीर्ण ३६ विद्यार्थी झाले. या निकालात कुणाल आवचर २८८ गुण मिळवत राज्यात राज्यात दुसरा आला. या शिवाय गुणवत्ता यादीत आरुष आढाव, मुकुंद गोडसे, शर्वरी वाबळे, अपेक्षा गाडेकर, श्रावणी गरुड, कावेरी मुंडे, कृष्णा खोंडे, साई थोरवे, श्लोक थोरवे, ओवी गावडे, वेदश्री गावडे, दूर्वा पाठक यांचा समावेश आहे.ङ्गमार्गदर्शक शिक्षिका छाया जाचक ७ विद्यार्थी गुणवत्ता यादीत तोरणा ब तुकडी ४० पट संख्या यात ३६ उत्तीर्ण झाले. या मध्ये आयशा शेख, सृष्टी पालवे, प्राची मिसाळ, संस्कृती कारले, श्रुतिका सुतार, साईराज काळबांडे, ऋषिकेश घनवट, ऋषिकेश मुंढे यांचा समावेश आहे.

# देशातही 'ट्विटर' मागे पडले.

खरे तर या घटनेचे कोणास आश्चर्य कसे वाटले नाही, याचे आश्चर्य वाटते. देशाच्या सर्वोच्च नेत्याच्या आदेशावरून लाखो, कोट्यवधींनी हे अॅप आपापल्या मोबाइलमधे डाऊनलोड करून घेतले. सर्वोच्च नेत्याच्या साजिंद्यांपाठोपाठ अन्य कोट्यवधी जल्पकांच्या आत्मनिर्भर गॅंग्सनी देशाच्या प्रतिष्ठेसाठी हातमिळवणी केली आणि हे अॅप वापरण्याचा निर्धार केला. कोण कोणते दीडदमडीचे ट्विटर! हजारो वर्षांची उज्ज्वल परंपरा असलेल्या, महासत्ता होऊ घातलेल्या, विश्वगुरूंची खाण असलेल्या या देशाच्या इभ्रतीचा अपमान करू धजते यामुळे 'सव्वासो क्रोर' भारतीयांना आलेल्या सात्त्विक संतापातून याचा जन्म झालेला.

इस्लामधार्जिण्या, पुरोगामी हिंदू धर्म बुडव्यांना याद्वारे चोख उत्तर दिले जात होते. लोकशाहीची जननी असलेल्या प्रदेशाच्या उद्धारासाठी कार्यरत जगातील सर्वात मोठ्या पक्षाच्या अनेक नेत्यांनी, अनुयायांनी याचा स्वीकार केलेला! या पक्षाचे अधिकृत सदस्यच मुळी १० -१२ कोटी. तेव्हा गेला बाजार सर्वोच्च नेत्याच्या आदेशानुसार इतक्या साऱ्यांच्या मोबाइलमधे तरी याचे अस्तित्व असणार. आणि तरीही हे 'कू' नामे अॅप मृत होते हे आश्चर्य आणि त्याचे कोणासही काही वाटत नाही, राष्ट्रीय शोक व्यक्त होत नाही, निती आयोग 'कू'च्या अवस्थेत लक्ष घालत नाही हे महद्आश्चर्य! ते व्यक्त करणे हे कर्तव्य ठरते. याचे कारण एकेकाळच्या 'ट्विटर'ला आणि आताच्या 'एक्स'ला पर्याय म्हणून साधारण पाच वर्षांपूर्वी या पुण्यभूमीत 'कू' या स्वदेशी मायक्रोब्लॉगिंग साइटचा घाट घातला गेला. सुरू झाल्या झाल्या केवढे कौतुक झाले या 'कू'चे. दिल्लीतून साक्षात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यापासून त्या पक्षाच्या राष्ट्र पुनरुत्थानासाठी भूतलावर अवतार घेतलेल्या गल्लीतील साध्या पक्ष कार्यकर्त्यांपर्यंत सगळ्यांनी या स्वदेशी भारतीय ट्विटरानुकरणाचा पुरस्कार केला. तथापि बुधवारी या 'कू'च्या पक्षाने आकाशाकडे पाहात चोच उघडून प्राण सोडले. हा हंत हंत नलिनी गज उज्जहार वगैरे वगैरे.

कारण काय? तर मागणी नाही आणि त्याहीपेक्षा मुख्य म्हणजे गुंतवणूकदार नाहीत. हे आश्चर्यावर आश्चर्य. खरे तर एका आत्मनिर्भर अभिव्यक्तीसाठी संभाव्य महासत्तेतून एकही गुंतवणूकदार 'कू'त गुंतवणूक करण्यासाठी पुढे येऊ नये यास काय म्हणावे? यामागे खरे तर भारताची प्रगती पाहू न शकणाऱ्या पाश्चात्त्य शक्तींचा हात असणार! अन्यथा पंतप्रधानादींनी आशीर्वादलेल्या उपक्रमासाठी एकही मायेचा पूत या देशात उभा राहिला नाही, हे कसे? आणि लागून लागून अशी कितीशी रक्कम या 'कू'पक्ष्यास लागणार होती? गेल्या काही वर्षांत 'कू'ने ५.७ कोटी डॉलर्स उभे केलेले. गेल्या तीन वर्षांत मात्र इतकाही पैसा उभा राहू शकला नाही. अब्जावधींची कंत्राटे मिळवणाऱ्या 'अ'घटित उद्योगपतींसाठी ही इतकी रक्कम म्हणजे खरे गल्ल्यातली चिल्लर. यापेक्षा कित्येक पट विवाहपूर्व सोहळ्यांवर खर्च होते. किंवा शहराशहरांत कबुतरांस चारा घालण्यावर आपल्या देशात तो घालणाऱ्यांकडून अधिक रक्कम खर्च होत असेल. पण त्यातील काही दाणेही या 'कू'पक्ष्याच्या वाट्यास येऊ नयेत? जवळपास सहा कोटी मोबाइलमध्ये हे अॅप होते एकेकाळी. 'ट्विटर'ची डिट्टो प्रतिकृती असलेल्या या भारतीय अनुकरणाचे कौतुक फक्त भारतीयांनाच होते असे अजिबात नाही. रोनाल्डिनोसारखा फुटबॉलपटू, दलाई लामा यांच्यासारखे धर्मगुरू असे अनेकजण 'कू' वापरत. 'ट्विटर' पूर्णपणे एलॉन मस्क याच्या हाती गेल्यावर तर ब्राझीलमधे 'कू'चे अनुयायी इतके वाढले की पाहता पाहता त्या देशातही 'ट्विटर' मागे पडले. अर्थात त्यामागे 'कू'चे नाममाहात्म्य होते, हे दुर्लक्षता येणार नाही हे खरे. एकेकाळची पोर्तुगालची वसाहत असलेल्या ब्राझीलमधे पोर्तुगीज बोलणारे अधिक असणार हे उघड आहे. पोर्तुगीज भाषेत 'कू' म्हणजे मानवाचा पार्श्वभाग. या 'वास्तवा'मुळे 'कू' त्या देशात समाजमाध्यमी कमालीचे लोकप्रिय ठरले. ब्राझीलमधील सर्वात मोठे 'कू' असा त्याचा उल्लेख होत असे. तरीही हा 'कू' पक्षी मृत झाला. त्याच्या प्रवर्तकांनी 'कू'स मूठमाती देत असल्याची अधिकृत घोषणा केली. असे का झाले असावे?

केवळ अभिनिवेश हेच भांडवल असेल तर काय होते, याचे हे जिवंत उदाहरण. आर्थिक पायाभूत सोयींचा अभाव असताना केवळ कोणास तरी धडा शिकवण्याच्या उद्देशाने हे 'कू' जन्मास घातले गेले. त्यात काही स्वतंत्र बुद्धिमत्ता होती म्हणावे तर त्याचा पूर्ण अभाव. अगदी पक्षाच्या बोधचिन्हासह ही तशीच्या तशी मूळ ट्विटरची प्रतिकृती होती. यशस्वी प्रारूपांच्या प्रतिकृती हे अर्थातच आपले वैशिष्ट्य! ॲमेझॉन यशस्वी ठरले? काढा फ्लिपकार्ट ! (तेही आपणास आपल्या हाती राखता आले नाही.) 'उबर' यशस्वी ठरली? लगेच भारतीय अनुकरण 'ओला' तयार. जगात 'टेड टॉक' गाजते आहे काय? लगेच त्याच्या बिनडोक मराठी अनुवादाचा उदय झालाच म्हणून समजा! वास्तविक उत्तम मूळ उत्पादन उपलब्ध असताना त्याच्या प्रतिकृतींस यशस्वी होणे फार अवघड असते हे सामान्यज्ञान. त्यातही मूळ उत्पादनापेक्षा अधिक काही मूल्यवर्धन, नावीन्यपूर्ण बदल असे काही असले तर प्रतिकृतीही टिकाव धरू शकते. तथापि आपल्या देशी 'कू'मध्ये या सगळ्याचा ठार अभाव होता. भारतीय भाषांत 'कू' करायची सोय सोडल्यास यात ट्विटरपेक्षा अन्य काहीही वेगळे नव्हते. तसे ते नंतर करावयाचे तर कल्पनाशक्ती लागते आणि ती आहे असे गृहीत धरले तरी कल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी पैसा लागतो. 'कू'बाबत तीच अडचण आली आणि यात काही गुंतवणूक-योग्य न आढळल्याने निधीचा रोख आटला. परिस्थिती इतकी बिघडली की बंगलोर-स्थित 'कू'वर कामगार कपातीची वेळ आली. पण एकट्या 'कू'लाच या परिस्थितीसाठी बोल लावणे योग्य नाही.

या जागेसाठी जाहिरात घेणे आहे

दैनिक
# सूर्योदय
गुरूवार ११ जुलै २०२४



या जागेसाठी जाहिरात घेणे आहे

## गौतम गंभीर टीम इंडियाचा प्रशिक्षक

नवी दिल्ली: भारताचे माजी क्रिकेटपटू गौतम





गंभीर यांची भारतीय क्रिकेट संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदी नियुक्ती झाली. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) मंगळवारी रात्री ही घोषणा केली. टी-२० विश्वचषक स्पर्धेनंतर प्रशिक्षक राहुल द्रविड यांचा कार्यकाळ संपणार होता. त्याचवेळी, द्रविड यांच्यानंतर गंभीर यांचीच यापदी नियुक्ती होणार असल्याचीही चर्चा रंगली होती. मंगळवारी यावर बीसीसीआयने शिक्कामोर्तब केले.

## आरक्षणावर सर्वपक्षीय बैठक

मुंबई: राज्यात मराठा आणि ओबीसी समाजात तेढ निर्माण होऊ नये, पुरोगामी महाराष्ट्राची परंपरा अबाधित राखतानाच राज्य शासन कुठल्याही समाज घटकावर अन्याय होऊ देणार नाही, अशी ग्वाही देऊन आरक्षणाबाबत राजकीय पक्षांनी आपली लेखी भूमिका, अभिप्राय शासनाला कळवावेत, असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंगळवारी येथे केले.सह्याद्री अतिथिगृह येथे आरक्षणाबाबत सर्वपक्षीय बैठक मुख्यमंत्री शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्यावेळी ते बोलत होते.

## एमटेक, एमई, एमआर्कची प्रवेश प्रक्रिया सुरू

मुंबई : राज्य सीईटी कक्षातर्फे एमई, एमटेक आणि एमआर्क या पदव्युत्तर व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रिया सुरू झाल्या आहेत. एमई आणि एमटेक या अभ्यासक्रमांसाठी मे महिन्यात सीईटी परीक्षा झाली होती. तर, एमआर्कसाठी त्या आधीच परीक्षा पार पडली. मंगळवारपासून प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून, अर्ज नोंदणीची अंतिम तारीख १७ जुलै असेल.

प्रक्रियेचा तपशील : एमई/एमटेक, एमआर्क
ऑनलाइन नोंदणी व अर्ज : ९ जुलै ते १७ जुलै
कागदपत्रांची पडताळणी : १० जुलै ते १८ जुलै
तात्पुरती मेरिट लिस्ट जाहीर २० जुलै २३ जुलै
तक्रारी व हरकती दाखल : २१ जुलै ते २३ जुलै
अंतिम मेरिट लिस्ट जाहीर २५ जुलै

## २ लाख देवून १० लाख मागले; आत्महत्या

२ लाख रुपये देवून त्याचे १० लाख रुपये मागून १० लाख देता येत नाहीत तर शेताची सौदाचिठ्ठी करून द्या असे सांगण्याच्या त्रासाला कंटाळून झालेल्या आत्महत्ये प्रकरणी अंबाडा ता. हदगाव येथील एका विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. देवका चंद्रशेखर वानखेडे रा.कोथळा ता.हदगाव यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दि.४ जुलैच्या सकाळी १०.३० वाजेच्यापुर्वी संभाजी वानखेडे यांच्या शेतातील झाडाला चंद्रशेखर वानखेडे यांनी फाशी लावून आत्महत्या केली. फिर्यादीप्रमाणे बजरंग भिमराव नरवाडे रा.अंबाडा ता.हदगाव यांच्याकडून शेतीच्या कामासाठी २ लाख रुपये घेतले होते. त्याच्या बदल्यात १० लाख रुपये द्या असे बजरंग नरवाडे सांगत होता. पैसे देता येत नसतील तर आपल्या शेताची सौदाचिठ्ठी करून द्या असे सांगून तो वारंवार चंद्रशेखर वानखेडेला त्रास देता होता आणि या त्रासाला कंटाळूनच चंद्रशेखर वानखेडेने आत्महत्या केली आहे.



**रिलायन्सचे कामगार नेते सतिश साहेबराव धुमाळ यांच्या ५७ व्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना सिताराम वारगे, हरिश्चंद्र घासे, शरद पारंगे, गजानन कुथे, दामोदर तांबोळी, तुळशीराम पारंगे, दिपक घासे, जयवंत घासे आदी कामगार बंधू**

## दापोली जिल्हातील जामगे येथील जिल्हापरिषद शाळे मध्ये शालेय वस्तू वाटप

दापोली (प्रतिनिधी)- वैष्णवी मागासवर्गीय सेवाभावी संस्थचे संस्थापक अध्यक्ष मोहन जाधव यांच्या सहकार्याने जामगे येथील सर्व जिल्हा परिषद मराठी शाळा, जामगे ,सातेरे ,शिरसाडी, विसापूर, खातलोली ,

पात्रिकोंड, बेंद्रेवाडी ,देवाचा डोंगर आणि नवभारत हायस्कूल जामगे ह्या सर्व शाळेच्या विद्यार्थ्यांना तसेच इतर शाळेतील गरजू विद्यार्थ्यांना शालेय वस्तू वाटप करण्यात आले. यावेळी जामगे गावचे सामाजिक कार्यकर्ते संस्थेचे सदस्य बुद्धिवान जाधव आणि सामजिक कार्यकर्ते संस्थेचे सदस्य



नितेश जाधव ह्यांच्या पुढाकाराने या कार्यक्रमचे आयोजन करण्यात आले होते. ङ्गसदर कार्यक्रमाचे अध्यक्ष स्कूल कमिटीचे अध्यक्ष शिवाजी कदम ह्यांच्या अध्यक्षतेखाली हा पूर्ण कार्यक्रम संपन्न झाला. ह्या कार्यक्रमसाठी प्रमुख उपस्थिती सुशिल पुपालाजी, एॅड.जॅकी जैन, एॅड.गौरव साळगावकर, विघ्नेश मारीचा आदी तसेच जिल्हातील सर्व सरपंच ,उपसरपंच पोलीस पाटील, तंटामुक्त अध्यक्ष, प्रमुख पदाधिकारी प्रतिष्ठित मान्यवर त्याच प्रमाणे जामगे गावचे सामाजिक कार्यकर्ते रवींद्र मोरे,अमित जाधव,महेंद्र जाधव,प्रमोद जाधव,अतीष जाधव आणि पालक, विद्यार्थी, शिक्षक उपस्थित होते . या सर्वांच्या उपस्थितीत शाळेतील गरजू विद्यार्थ्यांना शालेय वस्तू वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमसाठी नवभारत हायस्कूल जामगेचे सर्व शिक्षक यांनी योग्य सहकार्य करून कार्यक्रमाचे संपूर्ण आयोजन केले. शेवटी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मोहन जाधव, संस्थेचे सदस्य बुद्धिवान जाधव आणि नितेश जाधव यांनी सर्वांचे आभार मानले.

# सिद्धेश्वर शाळेत तयार केली आमराई



रायगड जिल्हा उत्तर प्रतिनिधी/मंगेश यादव रा . जि.प शाळा सिद्धेश्वर तालुका सुधागड येथे ८ जुलै २०२४ रोजी प्रधानमंत्री पोषणशक्ती योजनेअंतर्गत परसबाग निर्मिती करिता मुख्याध्यापिका खामकर मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली व निसर्गप्रेमी शिक्षक जनार्दन भिलारे यांच्या संकल्पनेतून १०,हापूस ,केशर, मल्लिका या प्रजातींची आंबा कलमे लागवड करण्यात आली. सदरची १०कलमे जनार्दन भिलारे यांनी स्वतः तयार करून दोन वर्षे वयाची रोपे शाळेस परसबाग निर्मिती करिता भेट दिली. या वृक्षारोपण कार्यक्रमासाठी शाळा

-वर्धापन दिन समिती अध्यक्ष अविनाश कोनकर, गुणेश दामले, रेश्मा सुरावकर, योगेश सुरावकर ,संतोष यादव ,सचिन मुंढे, रोहिणी खामकर ,जनार्दन भिलारे ,स्वप्नाली मेमाणे, सुप्रिया पोंगडे, सावंत काकी, यामिनी शिर्के, विद्यार्थी वर्ग उपस्थित होते. सदर झाडे जगविण्याची जबाबदारी इको क्लब विद्यार्थी प्रमुख सुयश वाघमारे व सदस्य आणि शिक्षक जनार्दन भिलारे यांनी घेतली. ''पर्यावरण रक्षण काळाची'' गरज या संकल्पनेतून या पर्यावरण स्नेही उपक्रमाचे शिक्षणाधिकारी प्राथमिक पुनिता गुरव, चे जिल्हा कार्यकारी रत्नशेकर गजभिये ,गटशिक्षणाधिकारी साधुराम बांगारे ,केंद्रप्रमुख कैलास म्हात्रे ,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष रविंद्र यादव व सर्व सदस्य यांनी कौतुक केले.

## जोरदार पावसाने शेततळी भरली. फळबाग लागवडीची चिंता मिटली.

तळा कृष्णा भोसले तळा तालुक्यातील सोनसडे, बोरघर हवेली, मेढा, कर्नाळा फळशेत, काकडशेत, भानंग, अशा ग्रामपंचायतीमध्ये प्रधानमंत्री असून या झाडांना उन्हाळ्यात लागणारेङ्गपाणी या तलावातून मिळणार आहे. शिवाय या तलावात मस्त व्यवसायला चालणार मिळणार आहे. यातुन शेतकरीङ्गबांधवांना



सुक्ष्म ०.२ कार्यक्रमाअंतर्गत पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमाअंतर्गत शेततळी खोदण्यात आली आहेत. या वर्षी चांगल्या झालेल्या पावसाने शेततळी भरली आहेत. या तलावात पाणी साचलेल्या या अंतर्गत फळबाग लागवड होणार आर्थिक उत्पन्न मिळणार असून याचा दुहेरी फायदा शेतकरी बांधवाना होणार आहे.ङ्ग सदरची तलु ही शंभर टक्के अनुदान तत्वावर मिळालीङ्गआहेत.याचा फायदा शेतकरी बांधवाना होणार आहे.

छत्रपती संभाजीनगर विभागीय कार्यालय पत्ता : लक्ष्मण फकिरबा कांबळे छत्रपती संभाजीनगर कांचनवाडी संभाजीनगर पत्ता पैठण रोड बेस्ट प्राईस कांचनवाडी डेंटल हॉस्पिटल जवळ (संपादक आवृत्ती), संपर्क : ९०२२६४३७७३ किरण काळे (आवृत्ती कार्यकारी संपादक

हे पत्र मालक, प्रकाशक संपादक गंगाधर सिताराम काळकुटे यांनी माऊली ऑफसेट प्रिंटर, एम.एस.ई.बी. ऑफिसजवळ, माळीवेस बीड- ४३११२२ येथे छापून दैनिक महाराष्ट्र सूर्योदय, हॉटेल रायगड, जिल्हाधिकारी ऑफिससमोर, नगर रोड, बीड ४३११२२ येथे प्रकाशित केले. मुख्य कार्यालय: जिल्हाधिकारी कार्यालया समोर, नगर रोड, बीड मुख्य संपादक: गंगाधर काळकुटे मो. ९८५४८९८९८९ , अंकामधील छापून आलेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (वाद बीड न्यायक्षेत्रे )